# डॉ. दीपक शिकारपूर

**कार्याचा परिचय**- डॉ. दीपक शिकारपूर म्हणजे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व! माहिती- तंत्रज्ञान, संगणक उद्योगातील अग्रणी, जागतिक कीर्तिचे तंत्रउद्योजक, समुपदेशक, प्रभावी लेखक आणि वक्तेही! डॉ. दीपक हे माहिती, तंत्रज्ञानविषयक जागतिक पातळीवरचे दर्जेदार शिक्षण भारतीय जनतेला उपलब्ध व्हावे यासाठी गेले अनेक वर्षे प्रयत्नशील असून संगणक साक्षरता, उद्योजकतेचे व योग्य व्यावसायिक शिक्षणाचे आग्रही पुरस्कर्तेही आहेत.

डॉ. शिकारपूरांचे स्वप्न म्हणजे आय.टी.-इंडियाज टॅलेन्ट- भारताला सन २०२५ पर्यंत एक विकसित राष्ट्र बनवेल. आपल्या ध्येयाचा पाठपुरावा त्यांनी डिजीटल युगाच्या माहितीच्या जनजागृतीने, समाजप्रबोधनाने केला. विविध संगणक संस्थांमध्ये उच्चपदस्थ असलेले डॉ. शिकारपूर सर्व स्तरांमध्ये सामाजिक प्रबोधन आपल्या लेखांमधून व व्याख्यानातून तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शनानेही करतात. गेल्या १५ वर्षांहूनही अधिक काल, त्यांच्या अनेक लेखमालात, वृत्तपत्रांतील संगणकाविषयीच्या स्तंभलेखनात त्यांनी नव्या तंत्रज्ञानाची माहिती अतिशय सोप्या पण अचूक शब्दात मांडली आणि जनसामान्यांनाही येणाऱ्या नव्या आव्हानांची ओळख करून दिली. हजारो विद्यार्थ्यांना त्यांनी समुपदेशन केले आहे. सायबर कायदे, इंटरनेट, मोबाईल, ईआरपी (एंटरप्राईज रिर्सोस प्लॅनिंग) सारख्या अनेक नवनवीन क्षेत्रांची ओळख ते सतत करून देत आहेत. डॉ. शिकारपूरांनी फक्त पुण्यातच नव्हे तर अनेक ठिकाणी दौरे करुन इंडियाज टॅलेन्टला आणि सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन प्रोत्साहित केले. त्यांनी अनेक चर्चासत्रे, माहिती व तंत्रज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्रभर आयोजित केली. त्यांचे शोधनिबंध, देशात तसेच परदेशात अनेक सेमिनार व कॉन्फरन्सेसमधे गौरविले गेले आहेत.

कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडियाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात १९९८ मध्ये व नंतर २००० पर्यंत, डॉ. शिकारपूर पुणे शाखेचे अध्यक्ष होते. त्या कालावधीत डॉ. दीपक यांनी अनेक परिसंवाद, कार्यशाळा, व्याख्याने, लेख, मान्यवरांच्या भेटी असे भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन सतत केले आणि नव्या तंत्रज्ञानाबरोबर येणाऱ्या अपारंपारिक सामाजिक व वैचारिक बदलांसंबंधी जनजागृती केली. प्रदर्शने, चर्चासत्रे, प्रशिक्षण केंद्रांना प्रोत्साहन, शिक्षकांसाठी कार्यशाळा अशा उपक्रमांमधून या ‘आय.टी. गुरू’ने माहिती व तंत्रज्ञानाची गंगा घरोघरी कशी पोहोचेल या जाणीवेची नांदी केली. अनेक संस्थांच्या उच्च पदांवर कार्यरत असूनही डिजीटल सहस्त्रकाबद्दल समाज जागृतीचे त्यांचे कार्य चालूच राहिले आहे आणि म्हणूनच पुण्यामधील ते एक लोकप्रिय संगणकतज्ञ आहेत.

त्यांनी संगणकाविषयी विविध विषयांवर १६ पुस्तके लिहीली आहेत. सोप्या भाषेत असल्याने त्यांची पुस्तके लोकप्रिय ठरली आहेत. त्यांचे **उद्याचे संगणक** (IT 2020) हे पुस्तक डॉ. प्र. चिं. शेजवलकरांसारख्या नामवंतांनीही त्यातील संगणकाविषयीच्या दूरदृष्टीबद्दल आणि ओघवत्या माहितीप्रचुर भाषेबद्दल वाखाणले

आहे. सर्व पुस्तकांच्या  सरासरी ३ आवृत्ती विकल्या गेल्या आहेत. यातून आलेल्या रकमेचा विनियोग ते उपेक्षित वर्गाच्या माहिती, तंत्रज्ञान शिक्षणासाठी करतात.

डॉ. शिकारपूर शिवाजीनगर रोटरी क्लब ऑफ शिवाजीनगरचे सन १९९१ पासून क्रियाशील सभासद असून त्यांचे कार्यक्षेत्र माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार हेच आहे. २००५-०६ मध्ये क्लबचे ते अध्यक्ष होते आणि त्यांना सर्वोत्कृष्ट अध्यक्ष म्हणून गौरविण्यात आले होते. रोटरीमधील अनेक पदे त्यांनी भूषविली असून त्यांना रोटरीच्या माध्यमातूनही समाजोपयोगी विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत आहेत. **२०१३-१४ साठी त्यांची जिल्हा प्रांतपाल (डिस्ट्रीक्ट गव्हर्नर) म्हणून बिनविरोध निवड झाली आहे.** प्रांत ३१३१ मध्ये पुणे, रायगड, पनवेल व कोकण प्रभाग समाविष्ट आहे.

डॉ. शिकारपूरांचे माहिती व तंत्रज्ञानासंबंधीचे सर्वस्तरांवरील शैक्षणिक कार्य अनेक माध्यमांतून गेले २० वर्षांहून अधिक काळ चालू आहे त्यामुळे पुण्यात त्यांचे नाव, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राशी निगडीत झाले आहे.

**शैक्षणिक पार्श्वभूमी** - शालेय जीवनात तसेच सांगलीच्या वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजमध्येही विविध स्पर्धात भाग घेऊनही मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी १९८५ मध्ये त्यांनी विशेष प्राविण्य व विद्यापीठात सहाव्या कमांकाने पटकावली. त्यानंतर १९८८ मध्ये आय.एम.डी.आर. मधून बिझीनेस मॅनेजमेंटचा डिप्लोमा तसेच मास्टर्स डिप्लोमा त्यांनी विशेष प्राविण्यासह संपादन केला. २००८ मध्ये माहिती, तंत्रज्ञान आणि प्रोजेक्ट मॅनेजमेंट या विषयावर संशोधन करून अमेरिकेतील यंगस्फील्ड विद्यापीठात पी.एचडी चा बहुमान मिळवला. एवढेच नव्हे तर २०१० मध्ये भारती विद्यापीठात इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजीमध्ये डॉक्टरेट संपादन केली. १५ वर्षे टाटा समूहात काम केल्यावर डॉ. शिकारपूर स्वतंत्र तंत्रउद्योजक म्हणून ते कार्यरत आहेत.

डॉ. दीपक शिकारपूरांच्या प्रभावी व्यक्तिमत्वाचा मागोवा घेतला तर खेळ, कलात्मकता यांची व्यावसायिकतेशी योग्य सांगड घातलेली प्रकर्षाने जाणवते.

**भूषवलेली विविध पदे**

- ऑटोलाईन डिझाईन सॉफ्ट वेअर, सीड इन्फोटेक, प्युअर आय.टी., फडणीस इन्फ्रास्ट्रक्चर  इ. कंपन्यांचे ते संचालक आहेत.
- मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या आय.टी.सब कमिटीचे अध्यक्ष
- माजी अध्यक्ष -कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया, पुणे
- पुणे विद्यापीठात कॉम्प्युटर मॅनेजमेंटच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून नेमणूक
- तंत्रशिक्षण मंडळ - सुधार समिती, महाराष्ट्र राज्य, नियामक मंडळाचे सभासद

- विश्वस्त – भारतीय विद्याभवन, पुणे केंद्र
- विद्यार्थी सहायक समितीची, गावाकडून आलेल्या‘विद्यार्थ्यांची कमवा व शिका’ योजनेचे माजी विश्वस्त

**गौरव व पुरस्कार –**

- कॉसमॉस पुरस्कार २००० (इतर पुरस्कार विजेते सुधीर गाडगीळ, घैसास गुरुजी)
- कै. शंतनुराव किर्लोस्करस्मृती पुरस्कार –महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवात उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान. १ मे २००१
- सन्माननीय सदस्य (फेलो) इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्स, महाराष्ट्र ॲकेडमी ऑफ सायन्स
- वीर सावरकर पुरस्कार २००६
- रँग्लर परांजपे पुरस्कार (२००७)
- मा. मुख्यमंत्र्यांनी स्थापलेल्या आय.टी. गटाचे सभासद
- नागपूर विद्यापीठाच्या कौशल्यपीठाची कोनशिला डॉ. शिकारपूरांच्या हस्ते बसवली गेली. (२०११)
- एज्युकॉन या कुलगुरुंच्या विचार परिषदेचे ते अतिथी वक्ते असून अतिथी वक्ते म्हणून थायलंड, मलेशिया तसेच श्रीलंका येथे निमंत्रण.
- महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे तंत्रज्ञान व शास्त्र लोकप्रिय करणाऱ्या लेखकांना दिला जाणारा कै. गो.रा. परांजपे पुरस्कार २०११.

**वैयक्तिक परिचय –**

**छंद** – डॉ. दीपक शिकारपूर यांचा देवावर विश्वास आहे. त्यांचे वाचन अफाट आहे. सर्व प्रकारच्या खेळात, पोहणे, टेबल टेनिस, बॅडमिंटन, ब्रिज खेळणे याशिवाय ट्रेकिंग आणि चालण्यामध्ये त्यांना विशेष रुची आहे. त्यांनी कॉलेजच्या काळात टेबल टेनिसच्या टेच्या टूर्नामेंटस् जिंकल्या आहेत. बॉलिवूडचे सिनेमे, त्यांचे प्रिमियर्स ते आवर्जून पाहतात. वंडरग्रुपसाठी तसेच व्हीएलसीसी साठी त्यांनी मॉडेलिंग केले आहे आणि राजकारण या मराठी सिनेमात काम केले आहे. त्यांचा लोकसंग्रह अफाट आहे.

**लेखन** – डॉ. दीपक अनेक विषयांवर लेखन करतात, त्यांची प्रवासवर्णने व नवीन पिढीसाठी लिहिलेले पुणे २०२५ एक चिंतन, वृत्तपत्रांतील लेखमाला खूप लोकप्रिय झाल्या आहेत.

**व्याख्याने –**

अनेक व्याख्यानमालांत, चर्चासत्रात उल्लेखनीय सहभाग

- मनोरंजन मंडळ आयोजित समाजप्रबोधन व्याख्यानमाला, इचलकरंजी, १५ मे २०११
- साहित्य संस्कृती महोत्सव, कोल्हापूर, २२ एप्रिल २०११
- मराठी साहित्य सांस्कृतिक महोत्सव, बारामती–२०११
- वक्तृत्वोतेजक मंडळ पुणे, आयोजित वसंत व्याख्यानमालेत ३ वेळा भाषणाचा सन्मान. (२००१, २००७ व २००९)
- रामभाऊ म्हाळगी व्याख्यानमाला, ठाणे, २००८
- शिशीर व्याख्यानमाला, चिंचवड, २००६
- कै. साहेबराव बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमाला, राजगुरुनगर २००६
- कै. नानासाहेब परुळेकर स्मृती व्याख्यान कोल्हापूर २००२, नाशिक २००२
- कै. जवाहरलाल दर्डा स्मृति व्याख्यानमाला, यवतमाळ २००२

**प्रवास –** गेल्या २० वर्षात व्यावसायिक व खाजगी कारणांसाठी त्यांनी ३३ हून अधिक देशांना भेटी दिल्या आहेत. आपल्या स्वप्नाचा पाठपुरावा करण्यासाठी सर्व भारत त्यांनी पालथा घातला आहे. त्यांना प्रवास करायला आवडते.

**कौटुंबिक –** त्यांची पत्नी रोटेरियन गौरी ह्या शास्त्रीय संगीताच्या शिक्षिका असून पॉल हॅरिस सोसायटीच्या सन्मान्य सदस्या आहेत. त्यांचा मुलगा वेदव्रत, आय.टी. तील पदवी शिक्षण घेत आहे.